## प्रवृत्ती आणि अस्मितेतला फरक

09 May, 2009 संजय पवार

**जोपर्यंत आम्हाला प्रवृत्ती आणि अस्मितेतला फरक कळत नाही, तोपर्यंत आम्ही 'आवाज कुणाचा?' म्हणून केलेल्या 'राड्यांलाच' आम्ही आपली मराठी अस्मिता म्हणू! या प्रवृत्तीनेच आम्ही मराठी अस्मिता धोक्यात आणलीय. महाराष्ट्रात रूजलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रांचा लेखाजोखा या वर्षभरात 'कोलाज'मध्ये घेण्यात येईल. या मालिकेतील दुसरं पाऊल टाकत आहेत लेखक-नाटककार संजय पवार**

'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि मराठी चित्रपटसृष्टीसह हिंदी चित्रपटसृष्टी, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जगतासह सामाजिक, राजकीय जगातही एक नवा चर्चेचा विषय बनला.

महेश मांजरेकर निर्मित-अभिनित आणि संतोष मांजरेकर दिग्दर्शित या चित्रपटाचे संवाद लेखन मी केलेय. गेली काही वर्षे मी संवाद लेखनाचे काम करतोय. त्यात 'मुक्ता', 'सातच्या आत घरात', 'डोंबिवली फास्ट', 'मातीच्या चुली', 'आई शप्पथ', 'सनईचौघडे' या मराठीसह 'विरुद्ध' या हिंदी चित्रपटाचाही समावेश आहे. 'शिवाजीराजे' या चित्रपटाचा संवाद लेखक आणि सातत्याने महाराष्ट्रातल्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घडामोडींवर विविध माध्यमातून भाष्य करणा-या मला मात्र 'शिवाजीराजे'च्या निमित्ताने वेगळेच प्रश्न पडलेत!

स्वातंत्र्यानंतर संसदीय लोकशाही प्रणाली स्वीकारून, भारताने भाषावार प्रांतरचना करून भारतीय प्रजासत्ताकाची निर्मिती केली. भाषावार प्रांतरचनेत महाराष्ट्र हे प्रथम 'मुंबई इलाखा' नावाने द्विभाषिक राज्य होते. पुढे महाराष्ट्र व गुजरात ही दोन स्वतंत्र राज्ये करताना 'मुंबई कुणाची?' हा प्रश्न उपस्थित झाला.

'मुंबई कुणाची?' महाराष्ट्राची का गुजरातची एवढ्यापुरताच तो प्रश्न राहिला नाही. तर संयुक्त महाराष्ट्राच्या गौरवशाली आंदोलनाची निर्मिती या प्रश्नातून झाली. मुंबईप्रमाणेच बेळगाव, निपाणी, कारवार आणि गोव्यासह संयुक्त महाराष्ट्र हवा यासाठी प्रखर आंदोलन झाले. १०५ हुतात्मे या आंदोलनात झाले. मुंबई महाराष्ट्राला मिळाली. गोवा स्वतंत्र राज्य (केंद्रशासित) झाले. बेळगावचा प्रश्न मात्र आजही तसाच आहे.

या १ मे ला मुंबईसह महाराष्ट्र स्थापनेला ४९ वर्षे पूर्ण होऊन, महाराष्ट्राने ५०व्या वर्षात पदार्पण केले. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आणि महाराष्ट्राची राजधानी आहे. तरीही ५० वर्षापूर्वीचा सवाल 'मुंबई कुणाची?' घेऊन आजही एका नव्या संघटनेला जन्म घ्यावा लागतो? आक्रमक आंदोलने करावी लागतात? आज ५० वर्षानंतर प्रत्यक्ष शिवाजी महाराज रुपेरी पडद्यावरून अवतरून 'मराठी माणसा जागा हो' म्हणतात आणि झोपेतून खडबडून जागा झाल्यासारखा मराठी माणूस थिएटरकडे धावत सुटतो, काळ्या बाजारात तिकीट

घेतो! महाराज जे कान उपटतात ते पाहून, कान (आणि गालही) चोळत बाहेर येतो आणि त्वेषाने मनात, प्रसंगी जनात ओरडतो- 'जय भवानी! जय शिवाजी!' हा काय प्रकार आहे?

स्वत:च्याच राज्यात, स्वत:च्या लोकांसाठी आंदोलने महाराष्ट्रासह आसाम, पंजाब व ईशान्य भारतातही झाली. पैकी पंजाबात 'खलिस्तान' किंवा ईशान्य भारतात 'गोरखा लँड'ची आंदोलने फुटीरतावादी, रक्तरंजित आंदोलने होती, ज्यांना आंतरराष्ट्रीय राजकारणातून, शेजारी राष्ट्रातून छुपी मदत होती. आसाम मधला बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न महाराष्ट्रातसुद्धा लक्षणीय आहे; पण स्वत:च्याच राज्यात, राज्याच्या राजधानीत-स्थानिक भूमिपुत्र, त्यांची मातृभाषा आणि त्यांची संस्कृती यांच्या हक्कासाठी, सन्मानासाठी, अधिकृत वापरासाठी आंदोलने करावी लागणारी मराठी भाषा आणि मराठी माणूस हा संपूर्ण देशात एकमेव असावा! का आहे हा प्रश्न आजही अनुत्तरित? का होतायत आंदोलने? का निघतायत नवे पक्ष? 'शिवाजीराजे' चित्रपटात दोन तासांत या प्रश्नाचे काही पैलू विचारात घेता आले. त्याला मिळणारा प्रतिसाद पाहता या प्रश्नाची धग कमी झालेली नाही, हे मात्र समोर आले निश्चित! संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानंतर साधारण दशकभरात 'मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी' शिवसेनेचा जन्म झाला. भूमिपुत्रांना नोक-यांत ८० टक्के प्राधान्य हा मुद्दा घेऊन शिवसेना मुंबईत फोफावली. (कम्युनिस्टांचा प्रभाव कमी करण्यासाठी कॉंग्रेसनेच ती वाढवली, असा आरोप करून, त्या वेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे अभय सेनेला लाभले म्हणून राजकीय क्षेत्रात ती 'वसंत सेना' म्हणूनही ओळखली जात असे! पुढे कृष्णा देसाई खून प्रकरणात ते वेगळ्या प्रकारे अधोरेखित झाले.) मुंबईसह महाराष्ट्र निर्मून 'संयुक्त महाराष्ट्र समिती'ने नंतर महाराष्ट्रात सत्तेचे सोपानही चढून झाले! परंतु लवकरच फाटाफुटीने समिती जवळपास अस्तंगतच झाली! मराठी जनांचा हा भ्रमनिरास शिवसेनेने आक्रमक पद्धतीने दूर करत, ६९ साली 'बेळगाव'साठी मुंबई आठ दिवस जळत ठेवली. (शिवसेनाप्रमुखांना झालेली तेव्हाची ती एकमेव अटक व तुरुंगवास!) पुढे प्रजा समाजवादी पक्षाच्या सहाय्याने सेनेने मुंबई महापालिकेत खाते उघडले. त्यानंतर गेली जवळपास २५ वर्ष शिवसेना 'मुंबई महापालिकेत' सत्तेत आहे. तरीही २००८ साली 'मनसे' नामक नव्या पक्षाला 'मराठी पाट्यांसाठी' रस्त्यावर उतरावे लागते! 'शॉप ॲक्ट'प्रमाणे राज्याच्या भाषेत दुकानाची पाटी असणे हा नियम आहे, अन्यथा त्याला दंड आहे आणि हे सारे पालिकेच्या अखत्यारीत येते!

हा पूर्वेतिहास एवढ्यांसाठी सांगितला की, यातून हे लक्षात यावं महाराष्ट्राच्या राजधानीत मराठीसाठी लढणारी माणसे, ज्यांच्याशी लढतायत तीही मराठीच माणसे आहेत! महापालिका, राज्य सरकार, इथली सत्ताधारी माणसे आणि प्रशासन मराठीच आहे. तरीही 'मराठी पाटी लावा' म्हणून जर हिंसक आंदोलन करावे लागत असेल, तर इतरांनी मराठी भाषा, मराठी अस्मिता आणि मराठी संस्कृतीला का महत्त्व द्यावे किंवा साधे लक्ष द्यावे?

या चित्रपटाच्या गाण्यांच्या धनिफितीचे प्रकाशन करताना राज ठाकरे म्हणाले- ''या चित्रपटातून मराठी माणसाला जागा करण्याचा प्रयत्न आहे म्हणे. मीही माझ्या माध्यमातून तो प्रयत्न करतोय. आणखीही

कुणाला वाटलं तर करा.. पण कुणाच्या का करण्याने का होईना; पण तो मराठी माणूस जागा होऊ दे!'' मराठी माणसाला चेतवण्यासाठी एकच एक माध्यम उपयोगी नाही, याची जाणीव राज ठाकरेंना झाली, की कितीही ढोसा मराठी माणूस जागा व्हायचा नाही, हा भीतीवजा आत्मविश्वास? आणि खरी मेख इथेच आहे! मराठी माणूसच मराठी माणसाचा शत्रू आहे! या विधानाला दुहीचा शाप, भाऊबंदकी असली पुरंदरेछाप ऐतिहासिक भरजरी कारणे नाहीत. तर एकूणातच मराठी प्रवृत्ती त्याला कारण आहे. ही जी प्रवृत्ती आहे, तिलाच मराठी अस्मिता म्हणायचे? जोपर्यंत आम्हाला प्रवृत्ती आणि अस्मितेतला फरक कळत नाही, तोपर्यंत आम्ही 'आवाज कुणाचा?' म्हणून केलेल्या 'राड्यांलाच' आपली मराठी अस्मिता म्हणू!

मराठी अस्मितेकडे वळण्याआधी आपण मराठी प्रवृत्ती बघू. कारण या प्रवृत्तीनेच आम्ही मराठी अस्मिता धोक्यात आणलीय. मराठी माणसाची मूळ प्रवृत्ती ही 'चाकरमानी!' इमाने इतबारे चाकरी करून, प्रसंगी राजापेक्षाही राजनिष्ठ होण्यात मराठी माणसाला धन्यता वाटते! (प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचे वडील मुघल दरबारात सरदार होते आणि पुढे पुण्याच्या शनिवार वाड्यावर 'युनियन जॅक' फडकवणारेही पेशवाईतील मराठीच होते! ही परंपरा आजही विद्यापीठात मराठीचा वापर, न्यायालयात मराठीचा वापर यासाठीच्या लढाईतून निरंतर चालू आहे, हे दिसतेच!) दुसरी मराठी प्रवृत्ती सीमोल्लंघन करून नवनवीन प्रदेशांत जाणे (ऐतिहासिक काळात राजकीय अर्थाने सध्याच्या काळात नोकरी, उद्योगधंदे) याबाबत मराठी माणूस दहा पावले मागे! इतिहासात एकदाच अटकेपार झेंडे लावल्याची घटना वाक्प्रचार बनते यातच सगळे झाले! स्वत:च्या भाषेविषयीच न्यूनगंड असणे ही आणखी एक वाईट प्रवृत्ती, ज्यामुळे मराठी, महाराष्ट्रीय संस्कृतीच धोक्यात आलीय. जागतिकीकरणाच्या आणि संगणकीकरणाच्या रेट्यांत जगभरातच जवळपास अडीच हजाराहून अधिक स्थानिक भाषा, बोली, लिपी नष्ट होण्याच्या मार्गावर असताना, आपण स्वत:हूनच मराठीच्या मर्तिकाची तयारी करतो आहोत!

मराठी माणसाच्या या प्रवृत्तीमुळेच मुंबईसारखं मराठीबहुल पण बहुभाषी, बहुढंगी शहर काळाच्या ओघात 'कॉस्मोपॉलिटन' या उच्चभ्रू जार्गनमध्ये जाऊन, मराठी (भाषा आणि माणूस) सोडून इतर प्रांतीय भाषीय आणि मराठी असून इंग्रजी, हिंदी बोलणारे हे बहुसंख्य होऊन मूळ मराठी माणूस अल्पसंख्य झाला!

या दुरव्यवस्थेचा फायदा किंवा त्याला आवाज देण्याचं काम सत्तरच्या दशकात शिवसेनेने, तर एकविसाव्या शतकात 'मनसे'नं केलं आणि हे करताना त्याला 'मराठी अस्मिता' असे छाती भरून येणारं नाव दिलं आणि मराठी माणसाच्या हक्कासाठी आणि अस्मितेसाठी 'राडा संस्कृती' जन्माला घातली. राज्यातील काँग्रेसवाल्यांना आपल्याच दिल्लीतल्या नेत्यांना दाखवायला या दोन्ही सेना 'बागुलबुवा'सारख्या कामाला आल्या, येताहेत! त्यामुळे एकेकाळी गुंडसेना म्हणून शिवसेनेची निर्भर्त्सना करणारे आता त्यांचा राजकीय वापर, राजकीय हिशेब चुकते करण्यासाठी कसा करता येईल, याचा विचार करत असतात. किंबहुना राज्यात सेना-भाजप युतीचे सरकार येण्यासाठी काँग्रेसवाल्यांनीच रसद पुरवली होती!

या ‘राडेबाज’ राजकीय संस्कृतीमुळे काय झालं? राज्यभाषा, तिचा विकास, तिचे संवर्धन आणि वापर याकडे दुर्लक्ष झालं. भाषेच्या जोरावर हिंसक आंदोलने आणि परप्रांतीयांना मारहाण, यामुळे राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र, मराठी भाषा आणि मराठी माणूस यांना ‘गुंड प्रवृत्तीचे, घटनाविरोधी ते देशद्रोही’ ठरवण्यापर्यंत इतर राज्यांतील राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, लेखक, कलावंत आणि माध्यमे यांची मजल गेली. कारण स्वत:च्याच राज्यात स्वत:च्याच भाषेची आणि माणसांची गळचेपी कशी होते, हे (स्वाभाविकपणे) त्यांच्या आकलनापलीकडचे होते! स्वाभाविक यासाठी म्हटले, करुणानिधी राष्ट्रीय माध्यमांसमोरही तामिळमध्ये बोलतात आणि प्रणव मुखर्जी कोलकात्यात असताना कटाक्षाने बंगाली बोलतात! दाक्षिणात्य चित्रपटसृष्टी ‘भाषिक’ असून ‘राष्ट्रभाषा’ हिंदीला हिंग लावून विचारत नाही. मागच्या ‘आयफा’ (आंतरराष्ट्रीय पारितोषिक) पुरस्कार सोहळ्यांत मल्याळम अभिनेता माम्मुटी म्हणाला- ‘भारतीय चित्रपट म्हणून फक्त हिंदी चित्रपट नाहीत; दक्षिण भारतीय चित्रपटांशी स्पर्धा करा आणि मगच आंतरराष्ट्रीय पुरस्कार म्हणा!’ याउलट परिस्थिती मराठीत आहे. काही अपवाद वगळता मराठी नट-नट्या ज्या हिंदीत यशस्वी झाल्यात, त्या मराठीत काम करायला नकार देतात! माझ्या माहितीप्रमाणे संपूर्ण भारतात जिला ‘डाऊन मार्केट’ असं लेबल आहे, अशी मराठी एकमेव भाषा आहे!

मी जाहिरात क्षेत्रातही काम केलंय. सर्वाधिक खपाच्या मराठी दैनिकाला किंवा शंभर वर्षांची परंपरा असणा-यां दिवाळी अंकांना जाहिरातीच्या मीडिया प्लानमधून बाजूला ठेवणारे, डाऊन मार्केट म्हणणारे मीडिया प्लानर्स जन्माने मराठीच असलेले मी पाहिलेत! डाऊन मार्केट म्हणजे ज्याची खरेदीशक्ती कमी आहे, असा वाचक/प्रेक्षकवर्ग! मराठी माणसाची ही अशी प्रतिमा कुणी केली? आम्हीच! कारण ठेविले अनंते तैसेचि राहावे, सरकारी नोकरी करून पेन्शन, फंड, ग्रॅज्युईटी घेऊन गावी जाऊन घर बांधून मरावे! एवढीच आमची जीवनेच्छा!

बरं, सरकारी नोकरीतही ‘बढत्यांसाठी’ बदल्या नको! दादरच्या माणसाला शीवच्या पुढे म्हणजे दंडकारण्य वाटतं! महाराष्ट्राबाहेर बदली म्हणजे जणू मंडालेचा तुरुंगवास! त्यातूनही महाराष्ट्राबाहेर गेल्यावर (अगदी परदेशांतही) तिथल्या संस्कृतीत मिसळून चार गोष्टी शिकण्यापेक्षा मंडळ स्थापून सत्यनारायण, गणपती नि संगीत नाट्य महोत्सव भरवून पुरणपोळीचं जेवण किंवा दिवाळीचा फराळ करून खाता आला की आम्ही धन्य! अशा प्रकारे ‘डबक्यांचीच संस्कृती’ तयार केली. मग त्याला कुणी डाऊन मार्केट म्हणून नावे ठेवली, तर दोष कुणाचा?

अशी ‘डबकी’ अनेक रोगांना जन्म देतात! या ‘डबक्यांवर’ दगड मारणे सर्वांनाच सोयीचे होते! आणि मग आम्ही आमच्या संस्कृतीवर, अस्मितेवर घाला पडला म्हणून झुंडीने उठतो, काही जणांचे रक्त काढतो. स्वत:च्याच मालमत्तेचे नुकसान करतो. जनजीवन विस्कटतो आणि विजयी पताका लावल्याच्या थाटात पुन्हा ‘डबक्यात’ शिरतो!

गांभीर्याने विचार केला, तर आपल्याला असं म्हणता येईल की, संयुक्त महाराष्ट्र समितीने सनदशीर मार्गाने, आंदोलन करून मुंबई महाराष्ट्रापासून तुटू दिली नाही, तर शिवसेनेने मुंबई महाराष्ट्रापासून तोडतील यावर फक्त भावनेचे राजकारण केले.

मुंबई गुजरातला न देता महाराष्ट्रात राहिली, पण मुंबईवरचे गुजराती समाजाचे वर्चस्व कमी झाले? राज ठाकरे अमिताभ बच्चनवर टीका करतात, पण मुंबईतले व्यापारी साभिमान, खुलेआम गुजरातला पैसे पाठवतात, त्याकडे दुर्लक्ष करून नरेंद्र मोदींचे गुणगान करतात! नर्मदा धरणाच्या पाठिंब्यासाठी मुंबईत गुजराती लोकांची विराट सभा होते, गुजरातेत अत्यंत निर्दयपणे मेधा पाटकरांसह कार्यकर्त्यांना मारहाण होते, तेव्हा आपण शांत बसून होतो! छटपूजेला राजकीय ठरवणारे आपण, गुजराती लोक 'मुंबई तुमची, भांडी घासा आमची' म्हणतात, तेव्हा का गप्प राहतो? 'बजाव पुंगी, हटाव लुंगी' म्हणून दाक्षिणात्यांविरोधात आंदोलन करणा-यां सेनेच्या, महापालिकेत निरंतर सत्तेच्या, काळातच उडप्यांची हॉटेले आणि डान्स बार वाढले ना? प्रतिक्रियात्मक किंवा भावनेचे राजकारण करणारे सत्तास्थानी आले की, तेही भ्रष्ट होतात, हे मराठी जनतेने मुंबईतच पाहिलेय! मराठी अस्मितेच्या गर्जना करणारे ठाकरे कुटुंब, त्यांचे डॉक्टर नीतू मांडके यांचे हॉस्पिटलचे स्वप्न अलगद अंबानींच्या हातात कसे पडू देतात? आम्ही डॉ. नीतू मांडकेंचे स्वप्न, स्मारकात पण बदलू शकलो नाही!

मुद्दा हाच आहे की, 'मराठीच्या अस्मितेचं राजकारण' करणाऱ्यांनी गेल्या ४० वर्षात मराठी भाषा, संस्कृती, माणूस यांच्या संवर्धनासाठी काय सकारात्मक काम केले? यशवंतराव चव्हाणांनी, साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती, साहित्य-नाटय़-चित्रपट पुरस्कार, करसवलती, अनुदान यांसारखी दीर्घ पल्ल्याची कामे सुरू केली. कॉंग्रेसच्या राज्यकर्त्यांनी मुंबईकडे दुर्लक्ष केले, तरी मराठीसाठी वरील उपक्रमासह चित्रनगरी, भाषा अभ्यास केंद्र अशा अनेक गोष्टी केल्या. त्यातून खूप सकस निर्मितीही झाली. मराठी अस्मिता अशा सांस्कृतिक उपक्रमांतून जपली गेली. राडेबाज आंदोलने करणा-यांनी अशी दीर्घकालीन एक तरी योजना आखलीय? उलट परळ, दादरसारख्या भागातल्या चाळी, वाड्या विकत घेऊन नगरसेवक, आमदार, नेते बिल्डर झाले! मराठी माणूस उपनगरांत फेकला गेला. मुंबईतला मराठी टक्का कमी केला, कुणी?

'शिवाजीराजे'चे संवाद लिहिताना हे आणि आणखी बरेच प्रश्न डोक्यात होते. जेवढ्या अभिमानाने आपण अमेरिकेत जायला सरसावतो, तेवढे भारताच्याच इतर प्रांतात जायला का नाही सरसावत? फ्रेंच, जर्मन, रशियन शिकण्याच्या उत्साहासोबत चार भारतीय भाषा का नाही शिकाव्याशा वाटत?आपल्या पाल्याला मराठी माध्यमात घालावे का इंग्रजी, यावर घरात वाद का होतो? दोन मराठी माणसे एकमेकांत हिंदी किंवा इंग्रजीत का बोलतात? ज्या तारका मराठी चित्रपटात काम करायला नकार देतात, त्यांना आपण 'महाराष्ट्र गौरव'सारखे पुरस्कार का देतो? मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा आहे. आणि राज्यभाषेचा वापर कायद्याने व प्राधान्याने झाला पाहिजे, याबाबत मराठी राज्यकर्ते, प्रशासक उदासीन का? शासकीय मराठी क्लिष्ट व

संस्कृतप्रचुर, सर्वसामान्यांना न समजणारी का असते? इंग्रजी ही वाघिणीचे दूध असले, तरी मराठी हे आईचे दूध आहे, हे विसरून कसे चालेल? माझ्या मुलांना मराठी बोलणे ‘डिफिकल्ट’ जाते, असे अभिमानाने सांगणारे पालक मुलांना नेमके काय शिकवतात? मराठीसाठी ‘राडा’ करणा-या संघटनांच्या प्रमुखांची मुले आणि मराठी साहित्यिक-प्राध्यापक मंडळींची मुले इंग्रजी माध्यमात का शिकतात? पुन्हा हीच मंडळी, पहिलीपासून इंग्रजीचा सैद्धान्तिक वगैरे विरोध कसा काय करू शकतात? मराठी आमचा श्वास आहे, हिंदुत्व ध्यास आहे, असा भाषेचे नि धर्माचे कॉकटेल कसे काय करू शकतात? ‘शिवाजीराजे’मधले महाराज म्हणतात त्याप्रमाणे, अनेक गोष्टी करायला तुम्हाला कुणी अडवले होते? आता ५०व्या वर्षात शिरताना तरी आम्हाला प्रवृत्ती आणि अस्मितेतला फरक कळेल? अस्मिता टिकवायला राडेबाज आंदोलन नव्हे, तर स्वभाषेबद्दलचा अभिमान, तिच्यासाठी कायदेशीर संस्थापनेबरोबर विकास आणि संवर्धनाचे दीर्घकालीन उपक्रम जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत करावे लागतील हे आम्हाला कळेल का? की ‘यदा यदा ही धर्मस्य’प्रमाणे शिवाजी महाराज अवतरल्याशिवाय आम्हाला काही कळणारच नाही? नाही तर पोवाड्यात जसे झिलकरी ‘जीरं जीरं जी’ म्हणून री ओढतात, तसे आम्ही पुढा-यांच्या भाषणाला आणि नाट्य-चित्रपटातल्या संवादांना ‘टाळ्या’ वाजवत पुन्हा ‘डबक्यात’च राहू प्रवृत्तीला अस्मिता म्हणत!